## <u>जाहीर नोटीस(१)</u>

सर्व संबंधितांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की , खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील रस्त्याने बाधित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधिताकडून खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधितानी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त मिळकतीवर वरील जमीन मालकांशिवाय अन्य कोणचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधितांने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका तर्फे सदर जमीनीचा मोबदला खाजगी वाटाघाटीने मोबदल्याच्या स्वरूपात वरील जमीन मालकास अदा केला जाईल व जमीन महापालिका ताब्यात घेईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

<u>परिशिष्ट –१</u>

मिळकतीचे वर्णन – तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौंजे रावेत येथील १०९/२ पै मधील श्री प्रकाश विठ्ठल गोलहार यांच्या मालकीच्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील १८.०० मी रूंद रस्त्याने बाधित क्षेत्र १६०.८७ चौ मी व बांधकाम अयोग्य ३९.१३ चौ मी असा एकुण २००.०० चौ मी क्षेत्र जमीन त्यास चतु:सिमा खालीलप्रमाणे

चतु:सिमा – १८. ०० मी रस्ताबाधीत क्षेत्र १६०.८७ चौ मी व बांधकाम अयोग्य ३९.१३ चौ मी असा एकुण २००.०० चौ मी

उत्तरेस – स नं १०९ पै मिळकत
पूर्वेस - स नं ११० ची मिळकत
दक्षिणेस – लागू रस्ता
पश्चिम - स नं १०९ पै मिळकत

परिशिष्ट –२

मिळकतीचे वर्णन – तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौंजे चोविसावाडी येथील १५४/३ पै, मधील श्री गणेश चंद्रकांत मोरे व सौ.राजश्री गणेश मोरे यांच्या मालकीच्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील ४५.०० मी रूंद मंजूर रस्त्यापैकी ३०.००मी. रूंद रस्त्याने बाधित ९६.०० चौ मी क्षेत्र जमीन त्यास चतु:सिमा खालीलप्रमाणे

चतु:सिमा – ४५. ०० मी. रूंद मंजूर रस्त्यापैकी ३०.०० मी. रूंद रस्त्याने बाधित क्षेत्र ९६.०० चौ मी

उत्तरेस – स नं १५४ पै
पूर्वेस - लागू स नं १५४ पै
दक्षिणेस – लागू रस्ता
पश्चिम - लागू स नं १५४ पै

जाहीर नोटीस (२)

संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या ( टि.डी. आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्बंध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खलीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी,लीज लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११०१८ यांच्या कार्यालयात कोणत्याही वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधीताने तो जाणूनबजून सोडून दिला आहे. असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि डी आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे मोशी येथील श्री इस्माईल खाजाहुसेन संगम यांचे** मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील मौजे मोशी येथील **गट नं. ४५८पै ( जुना गट नं ४५६पै )** मधील मंजूर विकास योजनेतील १८.०० मी रस्ता व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासह १००मी. बफर झोन या प्रस्तावाने बाधीत होणारे २३५९.६२ चौ.मी. क्षेत्र जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

**चतु:सिमा : -**

**मौजे मोशी येथील गट नं. ४५८पै ( जुना गट नं ४५६पै )**
**घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासह १००मी. बफर झोन १८.०० मी रस्ता बाधीत क्षेत्र ( एकुण बाधित क्षेत्र २३५९.६२ चौ.मी )**

उत्तरेस :- **गट नं ४५७ ची मिळकत**

पुर्वेस :- **गट नं ४६१ व ४६२ ची मिळकत**

दक्षिणेस :- गट नं ४५८पै मिळकत

पश्चिमेस :- गट नं ४५८पै मिळकत

परिशिष्ट २)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे रावेत येथील स.नं. ८३/३ पै मधील श्री. दिवानजी पांडूरंग भोंडवे, श्री. पोपट धर्माजी कल्हापुरे, श्री दिलीप धर्माजी कल्हापुरे, श्री ज्ञानोबा धर्माजी कल्हापुरे, श्री. रतन रामबाबू आगरवाल व श्रीमती बिंदीया रतन अगरवाल यांचे तर्फे कुलमुखत्यारपत्रधारक मे. एस आर रियालिटी तर्फे भागीदार श्री संदीप रसिकलाल शाह यांचेमिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील आ.क्र. ४/८९ बेघरांसाठी घरे (HDH) या प्रस्तावाने बाधीत होणारे क्षेत्र एकुण २४००.०० चौ.मी. मधील जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

मौजे रावेत येथील स नं ८३/३ पै

चतु:सिमा :( आ.क्र. ४/८९ बेघरांसाठी घरे (HDH) या प्रस्तावाने बाधीत होणारे एकूण क्षेत्र २४००.०० चौ.मी.)

उत्तरेस :- स. नं. ८२ ची व स.नं. ८३/१ ची मिळकत

पुर्वेस :- स. नं. ८४ ची मिळकत

दक्षिणेस :- स.नं. ८३/३ पैकीची उर्वरित मिळकत

पश्चिमेस :- स. नं. ८३/२ ची मिळकत

परिशिष्ट ३)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे डुडुळगाव येथील गट नं. ६२ पै मधील श्री दिंगबर हरिभाऊ तळेकर, श्री. चंद्रकांत हरिभाऊ तळेकर, श्री. अशोक हरिभाऊ तळेकर, सौ. कल्पना चंद्रकांत ताम्हाणे व सौ. अनुसया हरिभाऊ तळेकर तर्फे कुलमुखत्याधारक मे. सुदिप डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री संदीप रसिकलाल शहा व श्री. आधार सुनिशकुमार चड्ढा यांच्या मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रूंद रस्ता या प्रयोजनाने बाधीत क्षेत्र १११९.४५ चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

मौजे डुडुळगाव येथील गट नं. ६२ पै. १८ मी. रूंद रस्ता, (बाधित क्षेत्र १११९.४५ चौ.मी.)

उत्तरेस :- लागू गट नं. ५८ ची मिळकत

पुर्वेस :- लागू गट नं. ६२ पैकीची उर्वरित मिळकत

दक्षिणेस :- लागू गट नं. ६२ पैकीची मिळकत

पश्चिमेस :- लागू गट नं. ६३ ची मिळकत

उपसंचालक,

नगररचना व विकास विभाग,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी पुणे ४११०१८

जाहिरात क्रमांक 334

दिनांक 28/9/019

सदरची जाहीर नोटीस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.